# प्रेसनोट

दि.०३/०८/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.५५७/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)गणेश जनार्दन देहाडे, वय–४२ वर्ष, ग्रामसेवक, मांडवे, वर्ग–३, ता.नगर, जि.अहमदनगर<br>२)अशोक भानुदास निमसे, वय–४८ वर्ष, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत मांडवे, ता.नगर, जि.अहमदनगर–इतर लोकसेवक |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ५,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ---- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांच्या वडीलांचे नावे मौजे मांडवे, ता.नगर येथे एम.आर.ई.जी.एस. योजने अंतर्गत विहीर मंजूर झालेली आहे. सदर विहीरीचे अनुदान रु.४२,०००/– हे मंजूर करणेसाठी पंचायत समिती नगर येथे प्रस्ताव पाठविणे करीता यातील आरोपी लोकसेवक गणेश जनार्दन देहाडे, ग्रामसेवक, मांडवे, ता.नगर, जि.अहमदनगर व अशोक भानुदास निमसे, वय–४८ वर्ष, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत मांडवे, ता.नगर, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/– रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयाकडे दि.१९/६/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन त्याच दिवशी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी गणेश जनार्दन देहाडे व अशोक भानुदास निमसे यांनी तक्रारदार यांचेकडे हॉटेल नंदनवन, न्यू टिळक रोड, अहमदनगर येथे पंचासमक्ष ५०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वीकारण्याची संमती दर्शविली म्हणून आज दि.३/८/२०२१ रोजी कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.५५७/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर